# नैसर्गिक रित्या तयार होणाऱ्या अन्नाचे महत्व.

**Debjeet Sarangi**

**हवामान बदलाच्या संकटात जंगलाकडे फक्त 'कार्बनचा साठा, म्हणून पाहीले जात आहे. जंगले ही अन्नाची भांडारे असून कित्येक गरीब जमातींसाठी त्यांचा उपयोग होतो. त्याला योग्य आधार दिला तर नैसर्गिक खाद्य बदलत्या हवामान संकटात अन्नाच्या असुरक्षितेचा उपाय होऊ शकतो.**

जंगले नैसर्गिक अन्नाचे समृद्ध स्रोत आहेत, जसे खाता येऊ शकणारी फुले, फळे, बियाणे, मशरूम, बांबूची फुटवे, कंद मुळे, पक्षी, मध आणि खाण्या योग्य कीटक इत्यादी. रायगड जिल्ह्यातील आदिवासी शेतकरी जवळपास ३० प्रकारच्या पिकांची एका वर्षात लागवड करतात आणि ते विविधतेसाठी जंगलावर विश्वास ठेवतात. आदी नावाचा शेतकरी म्हणतो, ''आम्ही जंगलासोबत कधीही तुलना करू शकत नाही. आम्ही ४० प्रकारचे पिके लावतो परंतु जंगलात २०० प्रकारचे खाद्य उपलब्ध आहे.'' जंगलात, उन्हाळ्यात विस्तीर्ण प्रकारचे खाद्य तयार होते. विशेषतः फळे तर पावसाळ्यात बांबूची अंकुर आणि मशरूम तयार होतात. हिवाळ्यात विविध कंदमुळे तयार होतात. तार्दिंगपाई गावातील वयस्क आदिवासी महिला परबती पुसिका म्हणते, ''जंगले आमची आई आहे. वर्षातील अत्यंत वाईट तीन महिन्यात माझ्या गावातील लोक कंदमुळे, बांबूची अंकुरे, हिरव्या वनस्पती आणि मधावर विसंबून असतात.''

कुटुंबाच्या आहाराविषयक गरजा भागवून यातील बरीच नैसर्गिक खाद्ये कुटुंबाच्या कमाईचे साधन आहेत. ''जेव्हा आमच्या घरात पैसा नसतो तेव्हा जंगलात वाढलेली हळद विकून तेल किंवा मीठ बाजारातून आणतो.'' असे आदी म्हणाला. नैसर्गिक खाद्ये स्वातंत्र्याची, आदर आणि स्वाभिमानाची जाणीव करून देतात. त्याहीपेक्षा महत्त्वाचे सावकारी पाशापासून मुक्त ठेवतात.

म्हणून आम्ही कृषीशास्त्र म्हणजे निवडक पिके लावून उत्पादन घेणे अशी तोडकी व्याख्या मान्य करावी काय? त्यात आम्ही मशागत केलेली शेती व सभोवतालची जागा, कुरणाची जागा, जंगलाची जागा, पाणवठे आणि घराची जागा वगळावी काय? 'अन्नधान्य उत्पादन' म्हणजे केवळ 'मशागत' करून पिकवलेले पिक होते काय? खाद्य अन्न गोळा करणे व संवर्धन करणे म्हणजे जिवंत शेती होय.

### जंगली खाद्याची कुटुंबाच्या आहारात भूमिका

रोजच्या आहारात जंगली खाद्याची भूमिका काय आहे हे समजण्यासाठी लिव्हींग फार्म संस्थेने २०१३ साली ओडिशातील रायगडा जिल्ह्यात



*आदीवासी कुटुंबात रोजच्या जेवनात जंगलात निर्माण होणारे अन्न असते*

अभ्यास केला. अभ्यासात असे आढळून आले की जुलै २०१३ च्या शेवटच्या आठवड्यापासून डिसेंबर २०१३ पर्यंत जंगलात १२१ प्रकारचे विविध जंगली खाद्य जमा करण्यात आले. सर्वसाधारणपणे प्रत्येक कुटुंबामागे ४.५६ किलो खाद्य जमा करण्यात आले. ज्यात २१ ते ६९ प्रकारचे खाद्य पदार्थ होते. सहा खेड्यांमध्ये सरासरी ०.७२५ किलो जंगली खाद्य रोजच्या आहारात समाविष्ट होते. ह्याचे प्रमाण शिजविलेल्या अन्नापैकी १२ ते २४.४% असे होते. खेड्याच्या वैशिष्ट्यानुसार आणि जंगलाच्या जैवविविधतेनुसार या जमाती २०% ते ५०% जंगली खाद्यावर अवलंबून असतात.

जंगलातून जमा करण्यात येणाऱ्या खाद्यांपैकी त्यात कंदाचा मोठा वाटा असतो. केटा नावाचे कंद स्थानिक जमातीसाठी अवर्षणात खाद्य म्हणून महत्त्वाचे आहे. पीटा कोंडा हे ४-५ महिन्यापर्यंत साठवून ठेवता येते. दुष्काळाच्या वर्षात लागवडीखालील पीक बुडाल्यास ही कंदे आणि इतर जंगली खाद्ये अन्नाची महत्त्वाची भूमिका पार पाडतात. त्याव्यतिरिक्त, ग्रामस्थांनी २२ पेक्षा जास्त हिरव्या भाजीपाला आणि १२-१५ विविध फळे जंगलातून जमा केले.

सहसा गावकरी जंगलामध्य गटा गटात जाऊन खाद्य गोळा करतात. जमा केलेल्या जिन्नसाला वाटून घेतात. जर कोणी जाऊ शकत नसल्यास त्यालासुद्धा वाटा देतात. कोणालाही सोडत नाही. प्रत्येक खेड्यासाठी परंपरागत स्वीकृत सीमा व कोणते जंगल कोणत्या गावातील लोकांनी वापरायचे हे आपसात ठरलेले असते. खेड्यातील प्रत्येक सदस्याला जंगल, झरे, वृक्षवल्ली आणि पर्यावरणातील इतर संसाधनावर समान हक्क आहे. जर एखाद्या खेड्यातील व्यक्ती शेजारील भागातील बांबूची फुटवे आणण्यासाठी जात असेल तर तिकडला व्यक्ती इकडे येऊन मध गोळा करतो. परस्परावलंबनाची संस्कृती लोकांच्या जीवनासाठी आणि पर्यावरणासाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

### घटणारी जंगलाचे संसाधने

प्रत्यक्ष अनुभव आणि समाजातील चर्चेनुसार असे दिसून येते की, जंगले उजाड पडली असून त्या ठिकाणी सागवान, बांबू आणि करंज या झाडांची लागवड केली आहे. त्यामुळे जंगलांची रचना वेगाने बदलत आहे. जंगलाची जैवविविधता घटत असल्यामुळे त्याचे नकारात्मक होणारे परिणाम हे जंगलातुन गौण उपज व जंगली खाद्य जमा करणाऱ्या महिलांना माहीत आहे. ऐंशी वर्षाची म्हातारी फुलो सिकोका म्हणते, ''जंगल बदलामुळे माणसे बदलली. या प्रक्रियेत आम्ही आमचे खाण्यायोग्य जंगली कंद हरवून बसलो. त्याकरिता आम्ही स्वतःचे खाद्य देणारी झाडांची लागवड करावयास हवी.''

मुख्य धारेच्या अन्न आणि शेतीच्या आकृतीबंधात नैसर्गिक रित्या, जंगलात निर्माण होणाऱ्या विविधतेचे अनेक महत्व व देशाच्या आदिवासींच्या परंपरागत जंगल आधारित खाद्यांकडे सर्वांचे दुर्लक्ष होत आहे. त्याचे महत्वच वाटत नाही. 'अन्न सुरक्षितता' बाबतीत सरकारी कल्पना म्हणजे रेशन कार्डवरून सवलतीच्या दरात गहू/तांदूळ केंद्रीय साठ्यातून (कोठारातून) पुरविणे. ज्यामधून ठराविक अन्न मिळते. स्थानिक पसंतीनुसार आणि सकस धान्य पिके जसे गौण तृणधान्य, कडधान्य, गळीत धान्य आणि हिरवा भाजीपाला जो आदिवासी आहाराचा भाग असतो अशी पीक पद्धती दुर्लक्षित केली आहे. त्याकरिता पुरेसे कायदे आणि धोरणाचा अभाव आहे. पारंपारिकरित्या जंगलावर अवलंबून असणाऱ्या लोकांचे जंगल जमिनीवर कायदेशीर हक्क नाहीत. जंगल हक्क कायदा येऊन दहा वर्षानंतरसुद्धा फक्त ६% ओडिशातील जंगली खेड्यांना कायम व कायदेशीर हक्क मिळाले आहेत.

### पुढील दिशा

हवामान बदल संकटाशी जुळवून घेण्यासाठी पारंपारिक रित्या धोरणात नैसर्गिक जंगली खाद्य संस्कृतीला जास्त महत्व आहे. जागतिकीकरण आणि नेहमी बदलत्या जगात मानवाने जंगलासाठी धोके निर्माण करून ठेवले आहे. हवामानाच्या संकटाने जंगलांना फक्त 'कार्बनाचा साठा' अशी वस्तू बनवून ठेवली आहे. त्यांची पर्यावरणीय कार्ये जसे ऑक्सिजनची उपलब्धता, पडणारा पाऊस, भूगर्भात जलभरण, जमिनीवरील मातीचे संवर्धन, दुष्काळ व पुरात आघात प्रतिबंधक आणि स्थानिक लोकांना अन्न पुरविणे सारख्या अनेक कार्यांना महत्त्व देणे गरजेचे आहे.

**पुष्कळशा राजकीय आणि वैज्ञानिक वर्तुळात अन्न सुरक्षितता व पोषण यास मोठे महत्त्व आहे. अन्नसुरक्षा व पोषणाच्या संवेदनशील भविष्याकरिता जंगले आणि वृक्षाच्या योगदानाला समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे.**

भारताच्या वन धोरणांना अन्न सुरक्षिततेच्या उद्दिष्टाच्या नजरेतून पाहीले पाहीजे व जोडले गेले पाहिजे. शाश्वत वन व्यवस्थापन म्हणजे सागाचे/इमारती लाकूड नव्हे तर वनाच्या विभिन्न कायाचे संवर्धन असावयास हवे. सार्वजनिक स्रोतावर लोकांचा अधिकार व सार्वजनिक जंगलामध्ये विविधता टिकविण्याच्या दृष्टीने लक्ष केंद्रित करावयास हवे. वन संसाधनाचे संवर्धन करण्यासाठी कालावधीची वाढ व अधिकार, विशेषतः महिलांना मिळाल्यास अन्न सुरक्षिततेसाठी शाश्वत संसाधन व्यवस्थापनेला आधार मिळेल. जंगलांकडे बघताना लोक आणि त्यांची संस्कृती जपणे गरजेचे आहे.

हवामान बदलाच्या संकटाला अनुसरून नैसर्गिक खाद्याच्या दीर्घकालीन स्वरूपाची धोरणे आखावयास हवीत. कृषिवने आणि शाश्वत शेतीकरिता स्थानिक प्रयत्न सुरू करावयास हवे. जेणेकरून रासायनिक खतामुळे माती व पाणी दूषित होणार नाही व कृषी पर्यावरण धोक्यात राहणार नाही. या दृष्टिकोनातून कृषी तंत्रज्ञान वापरल्यास जंगलाच्या विविधतेचे संरक्षणसुद्धा होईल. (उदा. रासायनिक शेतीमुळे मधमाशींची संख्या घटली.)

पुष्कळशा राजकीय आणि वैज्ञानिक वर्तुळात अन्न सुरक्षितता व पोषण यास मोठे महत्त्व आहे. अन्नसुरक्षा व पोषणाच्या संवेदनशील भविष्याकरिता जंगले आणि वृक्षाच्या योगदानाला समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे. जर स्थानिक वनांवर आधारित समाजाच्या अन्नाचे सार्वभौमत्व टिकविल्या गेले नाही तर त्या प्रांताचे संपूर्ण सार्वभौमत्व धोक्यात येईल. अन्न व पोषण यासाठी केवळ बाजारावर अवलंबुन राहणे धोक्याचे ठरेल. पण तेच ही वने विकेंद्रीकरणाद्वारे पोसू शकतात. नैसर्गिक खाद्य फक्त भूख मिटविणार नसून ती जंगलाचे संरक्षण व मानव आणि जंगले यांचे अतुट नाते घट्ट करणारा दुवा आहे.

**Reference**

Debal Deb, Kavitha Kurganti, V Rukmini Rao & Salone Yesudas, **Forests as food producing habitats - An exploratory study of uncultivated foods and food and nutrition security of adivasis in Odisha,** July 2014, Published by Living Farms.

S. Bhutani, **Forests, Our Food!,** Policy brief, 2014, Living Farms, Odisha.

**Debjeet Sarangi**
LIVING FARMS
Plot No. 1181/2146, Ratnakarbag-2, Tankapani Road,
Bhubaneswar-751018
Tel. 0674-2430616, 09938582616(M)
Email ID: livingfarms@gmail.com,
Website: www.vasundharaorissa.org

मराठी अनुवाद : डॉ. विनोद खडसे

*Source : Valuing un-cultivated foods – LEISA India June 2016.*